

# कोकण पर्यटन उद्योग संघ




पर्यटनातून कोकणचा विकास... हाच ध्यास...




समृध्द कोकण

## प्रस्तावना


महाराष्ट्रातील आणि देशातील सर्वात निसर्ग समृध्द प्रदेश म्हणजे कोकण. निसर्ग समृध्द कोकणातील सर्वात शाश्वत उद्योग म्हणजे पर्यटन. ९०० कि.मी. लांबी व कोकणाइतकेच क्षेत्रफळ असलेला केरळच्या पर्यटनाची अर्थव्यवस्था २८,००० कोटी इतकी आहे. कोकण केरळहून सुंदर आहे. शिवाय मुंबई शहर कोकणात आहे. जर नीट नियोजन केले, शासन-समाज व पर्यटन व्यावसायिक यांचा समन्वय झाला तर केरळपेक्षा मोठी अर्थव्यवस्था कोकणात निर्माण होईल. लाखो रोजगार या उद्योगातून निर्माण होऊ शकतील.

याच उद्देशाने कोकण पर्यटन उद्योग संघ ही संघटना काम करत आहे. आज कोकणात १ कोटींच्या आसपास पर्यटक येतात. या पर्यटकांसाठी हॉटेल्स, रेस्टॉरंट, रिसॉर्ट, कृषी पर्यटन, होम स्टे अशा विविध व्यवस्था येथील पर्यटन व्यावसायिकांनी उभारल्या आहेत. याशिवाय टूर ऑपरेटर्स, ट्रॅव्हल एजन्सी, वॉटरस्पोर्ट, ॲडव्हेंचर स्पोर्ट इत्यादी माध्यमातून असंख्य, उद्योजक काम करत आहेत. या सर्व व्यवसायिकांचे एकत्रित व्यासपीठ म्हणजे कोकण पर्यटन उद्योग संघ.

नव्याने व झपाट्याने विकसित होणारा उद्योग म्हणजे कोकणातील पर्यटन उद्योग, कोकणातील तरुणांना, शेतकऱ्यांना रोजगार देण्याची प्रचंड क्षमता या व्यवसायात आहे. आज हजारो तरुण या व्यवसायात काम करीत आहेत असंख्य अडचणी या व्यवसायिकांसमोर उभ्या आहेत. या अडचणींचा संघटीतपणे मुकाबला करण्यासाठी संपुर्ण कोकणातील ५ जिल्हयातील ही पर्यटन व्यवसायिकांची संघटना आहे. जास्तीत जास्त पर्यटन व्यावसायिकांनी या संघटनेत सहभागी व्हावे.

## सभासद शुल्क

- **प्रवेश शुल्क** : रु. १००/-
- **वार्षिक वर्गणी** : रु.१०००/-
- **प्रथम वर्ष एकूण वर्गणी** : रु. ११००/-
- **त्यानंतर दरवर्षी वार्षिक वर्गणी** : रु. १०००/-







## निवेदन

**पर्यटन विकासासाठी संघटनेच्या मागण्या**

- **पर्यटन धोरण (Tourism Policy) :-** हॉटेल व्यवसाय, होम स्टे, कृषी पर्यटन, वॉटर स्पोर्टस, निसर्ग पर्यटन, साहसी पर्यटन यांसदर्भात सोपे, पर्यटन उद्योग पुरक नियम (पॉलिसी) बनविणे. **या संदर्भातील परवानग्या दरवर्षीसाठी न देता ५ वर्षासाठी दयाव्यात. या परवानग्या सहजपणे त्या त्या जिल्हयात मिळाव्यात.**

- **कर सवलत (Tax Exemption) :- कोकणातील पर्यटन उद्योगाला प्रोत्साहन म्हणून मनोरंजन कर, जी.एस.टी. इ. कर १० वर्षाकरिता माफ करावेत.** सवलती देऊन हा उद्योग सुरुवातीला विकसित करावा.

- **विशेष सवलती (Incentive) :-** महाराष्ट्रातील मागास भाग म्हणून ओळख असलेल्या कोकणातील गावांचा विकास व्हावा व येथे गावागावात रोजगार निर्मिती व्हावी, याकरिता ग्रामीण पर्यटन (शेतकऱ्यांच्या घरात निवास व्यवस्था) कृषी पर्यटन (शेतकऱ्यांचे पर्यटन प्रकल्प), होम स्टे (घरगुती निवास व्यवस्था), हॉटेल व्यवसाय, वॉटर स्पोर्टस इ. **पर्यटन उद्योगांकरिता सहजपणे व कमी व्याज दराने कर्जपुरवठा व्हावा. कृषी, ग्रामीण व होम स्टे पर्यटनाकरिता प्रकल्प खर्चाच्या ४० टक्के अनुदान (सबसिडी) मिळावी.**

- **घरगुती दराने वीजपुरवठा :-** वर्षातून केवळ ६०-७० दिवसाचा हा उद्योग असल्यामुळे होम स्टे, कृषी व ग्रामीण पर्यटन, निवास आणि न्याहारी **प्रकल्पांकरिता घरगुती दराने वीजपुवठा मिळावा. तसेच हॉटेल, रिसॉर्ट व इतर सर्व प्रकारच्या पर्यटन प्रकल्पांसाठी औद्योगिक दराने वीज पुरवठा मिळावा.**

- **पर्यटन उद्योगातील बांधकामे नियमित करणे :-** कोकणातील निसर्गाच्या आकर्षणामुळे लाखो पर्यटक कोकणात येतात. हा एकमेव शाश्र्वत उद्योग असल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी, तरुणांनी







आपल्या जागांमध्ये निवास व्यवस्था, पर्यटन सुविधा उभारल्या. CRZ व अन्य नियमांमध्ये स्पष्टता नसल्यामुळे ही बांधकामे आज नियमबाह्य ठरवण्यात येत आहेत. व्यावसायिकांना सतत नोटीसा येतात. असुरक्षिततेची कायम टांगती तलवार आहे. या स्थितीत हा व्यवसाय सुरु आहे.

**CRZ व पर्यटन बांधाकामासंदर्भात स्पष्ट नियमावली बनवावी. या नियमाअंतर्गत बांधील राहून परवानगी मागितल्यास ती ३० दिवसाच्या आत सिंगल विंडो पध्दतीने मिळावी. याकरिता प्रत्येक जिल्ह्यात एक कार्यालय सुरु करावे.**

**मात्र नियम स्पष्ट नसल्यामुळे उभारण्यात आलेली आजपर्यंतची (२०१९ पर्यंत) कोकणातील पर्यटन उद्योगासाठीची सर्व बांधकामे (होम स्टे, कृषी पर्यटन, हॉटेल्स) आदि नियमित करावी. या शेतकऱ्यांना, व्यावसायिकांना सुरक्षितपणे व्यवसाय करु द्यावा.**

- **पायाभूत सुविधांचा विकास :-** कोकणातील पर्यटनदृष्टया महत्त्वपूर्ण गावात दरवर्षी १ लाख ते २० लाख पर्यटक येतात. या गावातील पायाभूत सुविधांची अवस्था अत्यंत वाईट आहे. रस्ता, पाणी, वीजपुरवठा, लाइफगार्ड, पार्किंग, उद्याने, टॉयलेट्स, स्वच्छतागृहे इत्यादी व्यवस्थांची गैरसोय जवळपास सर्व पर्यटनस्थळांवर आहे. **या पायाभूत सुविधांकरिता दरवर्षी १००० कोटी रुपयांचे विकासाचे पॅकेज कोकणाला पुढील १० वर्ष मिळावे. सर्व प्रमुख पर्यटनस्थळांचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा विकास आराखडा बनवून पुढील १० वर्षात टप्प्या टप्प्याने या सुविधा निर्माण कराव्यात.**
- **लाईफ गार्डस, सागरी सुविधा :-** दरवर्षी सागरी सुरक्षिततेच्या अभावी समुद्रात बुडून १०० हून अधिक पर्यटक मरतात. **कोकणातील प्रमुख सुमारे २० समुद्र किनाऱ्यांवर लाइफ गार्डस, लाईफ बोटस व सागरी सुरक्षेची व्यवस्था करावी. या कार्यात स्थानिक पर्यटन संस्थांना सहभागी करावे.**
- कोकणात विविध पर्यटन स्थळांवर **फ्रुट वाईन हब**ची निर्मिती करावी, याकरिता सहजपणे परवानग्या मिळाव्यात. **द्राक्ष वाईनप्रमाणे प्रकल्प उभारणीसाठी सबसीडी द्यावी व एक्साईज कर माफ करावा.**





## मुख्य उद्देश

- पर्यटन व्यवसायिकांसमोरील समस्यांना शासनासमोर आणणे व सोडविण्यासाठी कटिबध्द राहणे.
- पर्यटन, कृषी, पर्यटन, होम स्टे, निवास व्यवस्था, ॲडव्हेंचर स्पोर्टस, वॉटर्स स्पोर्टस या विषयाच्या पॉलिसी निर्माण करणे व यात सुत्रबध्दता आणणे.
- कोकणात पर्यटनाच्या पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात, यासाठी योजना तयार करुन शासनाबरोबर समन्वय करणे. शासनाला पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी उद्युक्त करणे.
- शासकीय यंत्रणा अधिकारी व कोकणात प्रत्यक्ष काम करणारे व्यावसायिक यांच्यामध्ये समन्वय करणे. याकरिता तज्ज्ञ समिती बनविणे.
- कोकणातील पर्यटनाला जगाशी जोडणे व जगभरातील पर्यटनाचे तंत्रज्ञान कोकणात आणणे, याकरिता अभ्यासदौरे, प्रशिक्षण कार्यक्रम करणे.
- कोकण पर्यटनाच्या जागतिक व देशभरातील प्रसिध्दी व ब्रँडींगसाठी प्रयत्न करणे.
- कोकणातील सर्व पर्यटन व्यावसायिकांना संघटीत करुन पर्यटन विकासाच्या मोठया योजना कोकणात आणण्यासाठी शासनाला उद्युक्त करणे.
- जिल्हास्तर पर्यटन परिषदा, मेळावे, प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.
- CRZ, टॅक्स पॉलिसी, पर्यटन उद्योगाच्या परवानग्या इ. कठीण समस्यांची उत्तरे शोधणे.
- पर्यटन विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, क्रीडा विभाग व महसूल विभाग यांच्याशी समन्वय ठेवणे.








## कार्यकारिणी

**संजय यादवराव**
संस्थापक व अध्यक्ष

**डॉ. दिपक परब**
कार्याध्यक्ष

## संचालक

**प्रभाकर सावे**
पालघर

**भूषण सावे**
पालघर

**महादेव निजाई**
पालघर

**शशिकांत महाडकर**
रायगड

**नरेश पेडणेकर**
रत्नागिरी

**मंगेश मोरे**
रत्नागिरी

**बाबा मोंडकर**
सिंधुदूर्ग

## जिल्हा प्रमुख

**आशिष पाटील**
पालघर

**सुदेश केमनाईक**
रायगड

**राजू भाटलेकर**
रत्नागिरी

**अविनाश सामंत**
सिंधुदूर्ग

**रविंद्र खानोलकर**
कोकण संघटक

## कार्यकारिणी

**दिनेश भट**
जव्हार

**प्रियांका सावे**
डहाणू

**संजय घरत**
केळवा

**कुंदन पाटील**
पालघर

**महेश पाटील**
अर्नाळा

**विश्वास जोशी**
अलिबाग

**संतोष पवार**
माथेरान

**किरण बाथम**
मुरुड

**अरुण सावंत**
श्रीवर्धन

**उदय बापट**
दिवेआगर

**सुयोग लांगी**
हरिहरेश्वर

**विवेक भावे**
दापोली

**शामकांत खातू**
गुहागर

**प्रमोद केळकर**
गणपतीपुळे

**आबा कांदळगावकर**
मालवण

**दिनानाथ बांदेकर**
सावंतवाडी


# कोकण पर्यटन उद्योग संघ
नोंदणी क्र.: ए.एल.सी/कार्यासन-१७/११०४७

११५, मिठा चेंबर (सत्यगिरी) २, भरतक्षेत्रच्या समोर, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४
संपर्क : ८८५०८०७२२७ / ०२२-२४१५५४१२